महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे- ४११ ००१
Email id :- mscepune@gmail.com    फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२२/ 1045
दिनांक :- 07 /०४/२०२२

प्रति,

**सर्व शासनमान्य टंकलेखन / लघुलेखन व संगणक टंकलेखन संस्थाचालक,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य**

**विषय :- शासनमान्य जीसीसी व जीसीसी - टीबीसी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांचालकांकडून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे या कार्यालयाकडे होणाऱ्या पत्रव्यवहाराबाबत.**

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र.संकीर्ण- २०१४ प्र.क्र.७३/एस डी-२, दिनांक ०५ डिसेंबर २०१६.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयाकडे शासनमान्य संस्थांचालकांकडून अनेक प्रकाराच्या तक्रारी प्राप्त होत असतात.

सदर प्राप्त तक्रारींमध्ये अनाधिकृत विद्यार्थी परीक्षेस बसविणे, अनाधिकृत स्थलांतर अशा विविध विषयांबाबत वारंवार तक्रारी संस्थाचालकांकडून या कार्यालयास प्राप्त होत असतात.

महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन,लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम, १९९१ ची सुधारित नियमावली, २०१६ मधील प्रकरण १ मधील मुद्दा क्र. ११ (ब) नुसार संस्थांना मान्यता देणे, काढुन घेणे आणि रद्द करणे व आवश्यकतेनुसार तपासणी करणे याकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून विभागीय शिक्षण उपसंचालक हे आहेत.

महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन,लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम, १९९१ ची सुधारित नियमावली, २०१६ मधील प्रकरण १ मधील मुद्दा क्र. ११ (क) नुसार संस्थांची तपासणी करणे,मार्गदर्शन करणे आणि त्यांवर सर्वसाधारण नियंत्रण ठेवणे यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी(माध्यमिक शिक्षण) हे आहेत.

आपल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही व्हावी व समस्येचे निराकरण जलद गतीने व्हावे यास्तव सर्व संस्थाचालकांना कळविण्यात येते कि, सदरील पत्र निर्गमित झाल्यापासून आपल्याकडील उपरोक्त विषयांबाबतच्या तक्रारींबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) यांच्याकडे नियमानुसार पत्रव्यवहार करावा.

तसेच परीक्षा परिषद या कार्यालयाकडे अशा तक्रारींबाबत यापुढे पत्रव्यवहार केल्यास सदरील प्राप्त पत्रावर कोणतीही कार्यवाही न करता सदरचे तक्रारीबाबतचे पत्र दप्तरी दाखल करण्यात येतील, याची सर्व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. तसेच सदर बाब आपले विद्यार्थी / पालक यांचे निदर्शनास आणावी.

1.4.2022
**(शैलजा दराडे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत माहितीस्तव :**

**१) मा.आयुक्त (शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे - ०१.**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:**

**१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).**
**२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).**
**३) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प)**

D:\S\letter\Mantralay Patr.docx